दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक ३२८ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.२२ फेब्रुवारी २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मोदी सरकारचा नारायण राणेंना मोठा धक्का

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या अनेक दिवसांपासून महाविकास आघाडीचे ठाकरे सरकार आणि विरोधी पक्ष भाजप यांच्या आरोप-प्रत्यारोपांचा कलगीतुरा रंगताना दिसत आहे. केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते नारायण राणेही शिवसेनेवर टीका करण्याची एकही संधी सोडत नाही. एकीकडे नारायण राणे यांच्या मुंबईतील घरावर महापालिका कारवाई करण्याच्या तयारीत असतानाच दुसरीकडे राणे कुटुंबीयांचा मालवण जिल्ह्यातील नीलरत्न बंगल्यावर हातोडा पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

केंद्रातील मोदी सरकारने यासंदर्भात कारवाई करण्याचे आदेश दिल्याची माहिती मिळाली आहे. मालवण जिल्ह्यातील चिवला समुद्रकिनाऱ्यावर राणे कुटुंबीयांचा नीलरत्न हा बंगला आहे. हा बंगला बांधताना सीआरझेड कायद्याचे उल्लंघन झाल्याची तक्रार एका माहिती अधिकार कार्यकर्त्याने केली होती. ऑगस्ट २०२१ मध्ये ही तक्रार करण्यात आली होती. त्यानंतर आता केंद्र सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ एन्व्हायरमेंट फॉरेस्ट अँड क्लायमेट चेंज नागपूर कार्यालयाने महाराष्ट्र कोस्टल प्राधिकरणाला कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

## अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार प्रशासकीय इमारतीचा भूमीपूजन सोहळा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**अलिबाग तालुक्यातील मौजे उसर येथील नियोजित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीचा भूमीपूजन सोहळा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या शुभहस्ते, खासदार शरदचंद्र पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि.२२ फेब्रुवारी २०२२ रोजी सकाळी ११.00 वाजता संपन्न होणार आहे. अखेर रायगडकरांची स्वप्नपूर्ती झाली.**

हा भूमीपूजन सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री राजेश टोपे, मदत व पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित विलासराव देशमुख, राज्यमंत्री राजेंद्र शामगोंडा पाटील यड्रावकर, राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे, रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता जगन पारधी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. तर खासदार श्रीरंग बारणे, खासदार सुनील तटकरे, आमदार जयंत पाटील, आमदार निरंजन डावखरे, आमदार बाळाराम पाटील, आमदार अनिकेत तटकरे, आमदार भरत गोगावले, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रवीशेठ पाटील, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण आयुक्त विरेंद्र सिंग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये महाराष्ट्र राज्य सचिव सौरभ विजय हे या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

रायगड जिल्ह्याला पालकमंत्री म्हणून कु. आदिती तटकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर रायगडकरांची शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्वप्नपूर्ती झाली आहे. जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ५०० खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी आवश्यक बांधकाम यंत्रसामुग्री व पद निर्मितीस शासनाने मान्यता प्रदान केली असून अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी तब्बल ४०६ कोटी ९६ लाख ६८ हजार ३३६ रुपये खर्चाच्या अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र शासन वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या दि.३१ जानेवारी २०१२ च्या शासन निर्णयानुसार केंद्र शासनाच्या व भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मान्यतेच्या अधीन राहून अलिबाग येथे प्रत्येकी १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ५०० खाटांचे संलग्नित रुग्णालय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने अलिबाग तालुक्यातील मौजे ऊसर येथील सर्व्हे नं. ७५/१अ क्षेत्र १७-१०-१४ हेक्टर आर. मधील अनुक्रमे ६-००-०० हेक्टर आर व ३-५०-०० हेक्टर आर या सरकारी गुरचरण ग्रुप ग्रामपंचायत खानाव यांच्या नावे असलेल्या जमिनी पुनर्ग्रहित करून संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयाकरिता प्रदान करण्यात आल्या. तसेच मौजे ऊसर येथील सर्व्हे नं. ७५ / १क, क्षेत्र ०७-५०-४० हेक्टर आर. मधील ४-००-४४ हेक्टर आर. या महाराष्ट्र शासन, औद्योगिक विकास महामंडळाच्या नावे असलेल्या जमिनी शासनजमा करून संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालयाकरिता अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग यांना प्रदान करण्यात आल्या आहेत.

आतापर्यंत अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्याच्याशी संलग्नित ५०० रुग्णखाटांच्या रुग्णालयाकरिता पुढील चार वर्षात एकूण १ हजार ७२ पदांची निर्मिती करण्यास तसेच त्याकरिता येणाऱ्या रु.६१.६८ कोटी इतक्या अंदाजित खर्चास वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने मंजूरी दिली आहे. या नियोजित नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयासाठी यापूर्वी शासनाने मंत्रीमंडळ बैठकीत देण्यात आलेल्या मान्यतेनुसार आवश्यक पदनिर्मिती करण्यास उच्चस्तरीय समितीच्या मान्यतेची अटही शिथील करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तरी नागरिकांनी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी या भूमीपूजन सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन पालकमंत्री कु.आदिती तटकरे, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व अलिबाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.महेंद्र कुरा यांनी केले आहे.

## पालीफाटा येथील कारखान्याच्या गोडाऊनला भीषण आग

**दै.रायगड नगरी । खोपोली**



खालापूर तालुक्यातील खोपोली पेण मार्गावर पाली फाटा लागत असणाऱ्या एका गोडाऊनला आग लागली असून या आगीत मोठ्या प्रमाणात या गोडाऊनमधील माल जळून खाक झाले आहे. आगीची तीव्रता भयानक स्वरूपात असल्याने या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी विविध कारखान्याचे अग्निशमक दलाच्या जवानांनी शर्तीचे प्रयत्न करून आग आठोक्यात आणली असली तरी या कच्चा मालात केमिकल असल्याने या आगीच्या धुराचे लोट सुरूच असून हा केमिकल युक्त धूर परिसरात पसरल्याने नागरिकांना त्रास जाणवू लागला. त्यामुळे नक्की ही आग कशामुळे लागली याचे कारण गुलदस्त्यात आहे. याबाबत तपास सुरू असल्याची माहिती मिळाली आहे.

पालिफाटा येथे बन्साली ग्रुपचा निमा सोप साबण बनविणारी कंपनी असून या कंपनी या कंपनीचा कच्चा माल साठवून ठेवण्यासाठी पेण खोपोली मार्गावर पालिफाटा नजीक रस्त्याला लागूनच पत्र्याचे शेडने बनविलेले गोडाऊन आहे. या ठिकाणी साबण बनविण्यासाठी वेगवेगळ्या केमिकल्स जो साबण बनविण्यासाठी वापरण्यात येतो तो कच्चा माल यासह पॉंकिंग मटेरियल अन्य साहित्याने खचाखच भरलेल्या गोडाऊनला रात्रीच्या दरम्यान आग लागल्याने या गोडाऊन मधील जवळपास ४० लाखाचा कच्चा माल जळून खाक झाले असून कारखान्याचे मोठे नुकसान झाले आहे.

या आगीचे वृत्त समजताच खोपोली फायर ब्रिगेडच्या दोन गाड्या, उत्तम स्टील, अलाना कपंनी व टाटा स्टील फायर ब्रिगेड टिमने जवळ जवळ पहाटे ६ .३० पर्यंत आग विझवली. आगीमध्ये कोणतीही जिवीत हानी नाही. मात्र आग कशा मुले लागली याचा शोध सुरू असून प्राथमिक अंदाजानुसार शॉक सर्किट झाल्याचे समजते. सदरच्या गोडाऊन ला लागलेल्या आगीची तीव्रता वाढतीच होती. यात केमिकल युक्त पदार्थ कच्चा माल म्हणून साठवण करून ठेवला असल्याने दुसऱ्या दिवसापर्यत अधून मधून आगीचा भडका सुरूच होता. त्यामुळे येथील व्यवस्थापन व कर्मचारी वारंवार पाण्याचा मारा करीत होते.

## अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या घुसखोर बांगलादेशी नागरिकास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या घुसखोर बांगलादेशी नागरिकास पनवेल तालुका पोलिसांनी खारपाडा, आपटा फाटा येथून ताब्यात घेतले असून त्याच्या अटकेमुळे मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थाचे विक्री करणाऱ्यांचे रॅकेट उघडकीस येणार आहे.



पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ.जय जाधव, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) महेश घुर्ये, यांनी नवी मुंबई शहर नशामुक्त करण्याचे व अंमली पदार्थ सेवन व विक्री करणाऱ्या इसमाविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याचे वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. त्यानुसार पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे व.पो.नि रविंद्र दौंडकर यांना आपटा फाटा, खारपाडा, या ठिकाणी एक इसम अंमली पदार्थाची विक्री करणार असलेबाबत गोपनीय बातमीदारमार्फत खात्रीशीर माहिती मिळाल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकाकडुन अत्यंत सतर्कतेने, शिताफीने कौशल्यपूर्वक सापळा रचुन आरोपी मुसा सुलतान खान वय २५ वर्षे, यास ताब्यात घेवून त्याचेकडुन खालील प्रमाणे अंमली पदार्थाच्या साठा हस्तगत करण्यात आला. एकुण किमंत १३,२५,००० / - रू वर्णन मेथ एम्फेटामाइन याबा नामक अमली पदार्थाच्या एकुण ५४.१८० ग्रॅम वजनाच्या ५३० गोळ्या सदर इसमाच्या ताब्यात .../२

## संक्षिप्त...

### देशात भाजपला पर्याय करण्याची तयारी सुरू : ना.नवाब मलिक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्याचे अल्पसंख्याक मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांनी तेलंगणचे मुख्यमंत्री के. सी. राव आणि शरद पवार यांच्यासह मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबतच्या भेटीवर महत्वपूर्ण वक्तव्य केलं आहे. देशाच्या सध्याच्या राजकीय परिस्थितीवर सविस्तर चर्चा झाली. यापूर्वी महाराष्ट्रात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी आल्या होत्या. त्यांनीही मुख्यमंत्री ठाकरे आणि शरद पवार यांच्यासोबत चर्चा केली होती. आता चंद्रशेखर राव देखील आले. देशात भाजपला पर्याय करण्याची तयारी सुरू झालेली आहे, असा दावा मलिक यांनी यावेळी केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी वारंवार सांगितले आहे की, देशात भाजपच्या विरोधात एक महाआघाडी व्हावी, ज्यात काँग्रेस पक्षाचा देखील समावेश असावा. कारण २०२४मध्ये लोकसभा निवडणुकांपूर्वी नागरिकांच्या समोर भाजपला एक मोठा पर्याय उभा असेल, असे मलिक यांनी यावेळी सांगितले. मलिक यांनी सांगितले की, आता त्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे असे मला वाटते. निवडणुकांपूर्वीच तिसरी आघाडी होईल आणि भाजपला पुढच्या निवडणुकीत सत्तेपासून दूर करेल, असा दावाही मलिक यांनी यावेळी केला.

## पनवेलमध्ये ॲडव्हान्स ट्रॉमा केअर सेंटर तसेच प्रसूती व बालसंगोपन केंद्र उभारावे

### आ.प्रशांत ठाकूर यांची केंद्रीय आरोग्यमंत्र्यांकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये शंभर बेडचे ॲडव्हान्स ट्रॉमा केअर सेंटर आणि महापालिका क्षेत्रात प्रसूती व बालसंगोपन केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्याकडे केली.



केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री डॉ. मनसुख मांडविया आणि केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी रविवारी पनवेल येथील खांदा कॉलनीमधील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटरला भेट देऊन आढावा घेतला. भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी मंत्रीमहोदयांचे स्वागत केले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलमध्ये शंभर बेडचे ॲडव्हान्स ट्रॉमा .../२

## ही तर मराठ्यांच्या अस्मितेची लढाई ; आझाद मैदानातील आंदोलनात हजारोंच्या संख्येने सामील व्हा

**दै.रायगड नगरी । पेण**

सकल मराठा समाजाला आरक्षण मिळवण्यासाठी लाखोंच्या संख्येने शांततेत मोर्चे निघाले तरी देखील सरकारने आरक्षण दिले नाही. आता खासदार छत्रपती संभाजी राजे २६ फेब्रुवारीला मुंबई येथे आमरण उपोषणला बसणार आहेत. मराठा समाजासाठी ही अस्मितेची लढाई असून रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन सकल मराठा समाजाचे रायगड जिल्हाध्यक्ष विनोद साबळे यांनी आज पेण येथे बोलताना केले.



मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यासाठी छत्रपती संभाजीराजे स्वतः २६ फेब्रुवारीला मुंबई येथील आझाद मैदान येथे आमरण उपोषण करण्यासाठी बसणार आहेत. या उपोषणाला रायगड जिल्ह्यातून जास्तीत जास्त संख्येने सहभागी होण्यासाठी तयारी करण्यासाठी रायगड जिल्ह्याची बैठक आज पेण येथील मराठा समाज भवन (हॉल) येथे संपन्न झाली.

या बैठकीला उरण सकल मराठा समाज अध्यक्ष संतोष पवार, खालापूर तालुकाध्यक्ष अमित यादव, पनवेल तालुकाध्यक्ष ह.भ.प. .../२

## वशेणी गावात घराला आग

**दै.रायगड नगरी । उरण**

वशेणी गावातील समिर रामकृष्ण गावंड व कुंजवी रामकृष्ण गावंड यांच्या राहत्या घराला आग लागण्याची दुदैवी घटना घडली. सदर आग



विझवण्याचा प्रयत्न ग्रामस्थांनी तसेच अग्निशमन दलाच्या जवानांनी केल्याने मोठा अनर्थ टळला, परंतु आगीचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार वशेणी गावातील रामकृष्ण गावंड यांचे कुटुंबीय हे नवीन शेवा गावातील नातेवाईक मंडळींकडे लग्न समारंभासाठी गेले होते. तसेच रविवारी संकष्टी चतुर्थी असल्याने घरातील आजी ही गावात असणाऱ्या हरिपाठ कार्यक्रमास आपल्या राहत्या घराला कुलूप लावून बाहेर पडली होती. रामकृष्ण गावंड यांच्या राहत्या घरातून आगीच्या ज्वाळा बाहेर पडण्याचे भयानक चित्र गावकऱ्यांनी पाहीले. यावेळी भयभीत झालेल्या गावकऱ्यांनी एकच आरडाओरड करत सदर आग विझविण्याचा प्रयत्न केला. तसेच सदर आगीची माहिती अग्निशमन दलाच्या जवानांना व रामकृष्ण गावंड कुटूंबियांना दिली.

सदर आगीची माहिती अग्निशमन दलाच्या जवानांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण ठेवण्यासाठी .../२

## उरण तालुका वकील संघटनेच्या अध्यक्षपदी ॲड.दत्तात्रेय नवाळे

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुका वकील संघटनेची निवडणूक नुकतीच संपन्न झाली. या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲडव्होकेट



दत्तात्रेय नवाळे हे बहुमताने निवडून आले. ॲड. दत्तात्रेय नवाळेची अध्यक्षपदी निवड होताच त्यांच्यावरसर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव सुरु आहे .

२०२२-२३ सालाकरिता निवड झालेल्या कार्यकारणीत उपाध्यक्षपदी भारती भोईर, किशोर ठाकूर, सचिवपदी प्रसाद पाटील, खजिनदारपदी अर्चना माळी, ऑडिटर संतोष पाटील, सभासद अझीमन रईस अहमद अन्सारी, वृषाली पाटील, विपुल ठाकूर, धीरज डाकी यांचा समावेश करण्यात आला आहे.

ॲड. दत्तात्रेय नवाळेंची अध्यक्षपदी निवड होताच त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव सुरु आहे. मान्यवरांनी मोबाईल द्वारे व प्रत्यक्षात भेट घेऊन पुढील वाटचालीसाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# सिडकोकडून दुसऱ्या टप्प्यात ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तांतरण

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडकोकडून २१ फेब्रुवारी २०२२ रोजी दुसऱ्या टप्प्यात पनवेल तालुक्यातील, सिडको अधिकारक्षेत्रातील ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरण वन विभागाच्या कांदळवन कक्षाला करण्यात आले. डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या हस्ते एम आदर्श रेड्डी, विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना सदर कांदळवन क्षेत्राचे हस्तांतरण करण्यात आले. या आधीच्या पहिल्या टप्प्यात सिडकोने आपल्या अधिकारक्षेत्रातील २८१.७७ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागाला हस्तातंरण केले आहे. कांदळवनांचे पर्यावरणाच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेऊन, कांदळवनांचे राखीव वने म्हणून संरक्षण व्हावे, या उद्देशाने सिडकोकडून कांदळवनांचे हस्तातंरण करण्यात आले आहे. या प्रसंगी कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक सिडको, रविकुमार, मुख्य नियोजनकार (बांधकाम परवाना), सतिशकुमार खडके, अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन) आणि सिडकोतील अन्य अधिकारी त्याचप्रमाणे



कांदळवन कक्ष, मुंबई यांच्यातर्फे डी. एस. कुकडे, वनक्षेत्रपाल, नवी मुंबईदेखील उपस्थित होते. मुंबई महानगर प्रदेशातील कांदळवनांचे संरक्षण आणि जतन व्हावे याकरिता संबंधित शासन संस्था व प्राधिकरणांकडून आपल्या अधिकारक्षेत्रातील कांदळवन क्षेत्रांचे हस्तांतरण वन विभागाच्या कांदळवन कक्षाकडे करण्यात येत आहे.

सिडकोतर्फे यापूर्वी पहिल्या टप्प्यात पनवेल तालुक्यातील कामोठे येथील १३४ हेक्टर, पनवेल येथील ३८ हेक्टर व कोल्हे–खार येथील १०९ हेक्टर, अशा एकूण २८१.७७ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे ऑगस्ट २०२१ मध्ये वन विभागाकडे हस्तांतरण करण्यात आले होते. दुसऱ्या टप्प्यात सिडकोकडून पनवेल तालुक्यातील उलवे येथील २४.२० हेक्टर, वहाळमधील ३.१५ हेक्टर, वाघिवलीतील ३९.९४ हेक्टर आणि सोनखारमधील ०.७५ हेक्टर, अशा एकूण ६८.४ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे हस्तातंरण वन विभागाला करण्यात आले. त्याचप्रमाणे सिडकोने कांदळवन कक्षाच्या सहाय्याने ३७० हेक्टरवर खारफुटीची लागवड केली आहे. याचबरोबर मॅन्ग्रोव्ह इंटरप्रिटेशन सेलदेखील ऐरोली येथे आहे. जमिनीची धूप होण्यापासून वाचवण्यासह पुराचे पाणी व वादळाला अटकाव करण्यामध्ये कांदळवने महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच अनेक पशू–पक्षी व जलचरांचा कांदळवनांमध्ये अधिवास असतो. हे लक्षात घेऊन कांदळवनांना पुरेसे वैधानिक संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून कांदळवन क्षेत्र अधिसूचित करून, सिडकोकडून उपरोक्त कांदळवन क्षेत्राचा ताबा कांदळवन कक्षाला देण्यात आला.

# माथेरान मधील सर्वपक्षीयांनी स्वबळावर निवडणुका लढल्यास महत्वाकांक्षी मंडळींची होणार कोंडी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान या पर्यटनस्थळावर असलेल्या अगदी लहानशा नगरपरिषदेच्या सभागृहात विराजमान होण्यासाठी अनेकांना आ–तापासूनच दिवास्वप्न पडत आहेत. आपल्या पक्षाची अन्य भक्कम मताधिक्य असणाऱ्या पक्षासोबत आघाडी करून आपण अगदी सहजपणे स्वतःची दमडी सुध्दा खर्च न करता केवळ पक्षाच्या आर्थिक बळावर नगरपरिषदेच्या सभागृहात प्रवेश करून मोठया प्रमाणावर आर्थिक सुबत्ता प्राप्त करू शकतो असे दिवसा स्वप्न पाहणारे अनेक इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधून बसले आहेत.अद्यापही आरक्षण जाहीर झालेले नाही त्यामुळे निवडणुका केव्हा होतील याबाबत मतदारांसह इच्छुक उमेदवारांचा प्रचंड उत्साह वाढला आहे.काही मतदारांनी अगोदरच आपली आर्थिक गणिते मांडली आहेत. आपल्या मर्जीतील पक्षाशी आघाडी व्हावी जेणेकरून आपली पोळी भाजून घेता येईल अशी महत्वाकांक्षी मंडळी सध्यातरी मोठया अविर्भावात वा–वरताना दिसत आहेत. परंतु आगामी काळात जर कोणत्याही पक्षांच्या आघाड्या युत्या झाल्या नाहीत प्रत्येक पक्षाने परिस्थिती नुसार अथवा वरिष्ठांच्या आदेशानुसार स्वबळावर निवडणुका लढण्याचा पवित्रा घेतल्यास या महत्वाकांक्षी मंडळींची खूपच कोंडी होणार आहे.ना घरका ना घाट का अशीच काहीशी परिस्थिती यांची होताना दिसणार आहे. माथेरानच्या विकास कामांसाठी शासकीय भरीव निधी उपलब्ध होत असतो त्यातूनच सत्ताधारी लोकप्रतिनिधींचे सर्व काही व्यवहार अवलंबून असतात.आजची येथील राजकीय परिस्थिती लक्षात घेता स्वबळावर कोणत्याही पक्षाला बहुमत प्राप्त होणार नाही. कुणाच्या तरी कुबड्यांचा आधार घेऊनच निवडणुकीला सामोरे जावे लागणार आहे. आजवरच्या निवडणुका पाहता नगरपरिषदेच्या सभागृहातील कामकाजा बाबतीत जे काही घडत असते त्याची इत्यंभूत माहिती मतदारांना ज्ञात होत आहे त्यामुळे मतदार सुद्धा यावेळी उमेदवारांना आर्थिक दृष्ट्या खूपच त्रास देण्याची शक्यता नाकारता येत नाही.जरी एखादया उमेदवाराने आपल्या समाजाची मते अधिक आहेत असे गृहीत धरले तरी सुद्धा ते यावेळी चुकीचे ठरणार आहे. मतांसाठी उमेदवारांनी समाजाच्या मतदारांवर दबाव टाकण्याचा आटोकाट प्रयत्न केला तरी त्यास कुणीही भीक घालणार नाही अशी सध्याची एकंदरीत परिस्थिती निर्माण झालेली दिसत आहे.बहुजन समाज याठिकाणी सगळीकडे वावरत आहे.मागील पंचवीस वर्षांपासून कॉंग्रेस पक्ष हा प्रामुख्याने विरोधी पक्षाची भूमिका बजावत आहे. तर १९९६ आणि २०१६ याकाळात सत्ताधारी शिवसेनेचे वर्चस्व राहिलेले होते.राष्ट्रवादी कॉंग्रेसने सुध्दा मागील काळात शिवसेने सोबत सत्तेत वाटचाल केली होती.काही महिन्यांपूर्वी कॉंग्रेस पक्षाने स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवली होती. आणि वेळ आल्यास समविचारी पक्षांची इच्छा असल्यास त्यांना सोबत घेऊन निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी केली आहे.२०१६ मध्ये शिवसेनेचे एकहाती वर्चस्व होते त्यामुळे कदाचित त्यांनाही कुणाच्या आधाराची आवश्यकता दिसत नाही परंतु यावेळी निवडणुकीत कुणाची तरी सोबत असावी म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला नगरपरिषदेच्या सभागृहात सोबत घेऊन जाण्यासाठी शिवसेनेची काही मंडळी इच्छुक दिसत आहेत. तर शिवसेनेच्या दुसऱ्या गोटातील मंडळींची कॉंग्रेस आणि भाजप,शेकापक्षा सोबत आघाडी करण्याची इच्छा दिसत आहे. गटातटाच्या या राजकरणात अखेरीस सर्वांनाच वरिष्ठांच्या आदेशानुसार स्वबळावर निवडणूका लढवाव्या लागतात की काय अशी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता सुध्दा नाकारता येत नाही.सत्तेत येणाऱ्या पक्षावर आपली कमांड असावी अशी महत्वाकांक्षा बाळगणारी मंडळी कडीपत्त्याप्रमाणे दूर फेकली जाण्याची शक्यता आहे असेही राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

# तालुक्यातील रस्ते सुसज्ज करा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना कालवधीनंतर हॉटेल लॉजिंग रेस्टॉरंट गेले अनेक दिवस बंद होते. मुरुड येथे आता शनिवार–रविवारी पर्यटक दिसू लागले आहेत. त्यामुळे मुरुडचे पर्यटन स्थळे पर्यटकांनी फुलून लागले आहेत. पर्यटक आल्याने समुद्रकिनारी घोडागाडीची स्वारी करणाऱ्यांना आता रोजगार उपलब्ध होऊ लागला आहे. स्पीड बोट, बग्गी चालक यांना ही रोजगार मिळू लागला आहे. मुरुड येथे पर्यटक वाढणार असून त्या साठी मुरुड तालुक्यातील खड्डेमय रस्ते सुसज्ज व्हावे अशी मागणी पर्यटक व स्थानिक नागरिकांकडून होत आहे. पर्यटक आता हळूहळू मुरुडला येऊ लागले आहेत. विशेषत: शनिवार–रविवारी पर्यटक समुद्रकिनारी दिसू लागले आहेत. सायंकाळी समुद्र स्नान व घोडेस्वारी यावर पर्यटकांचा अधिक कल दिसून येत आहे. मुरुडमधील लॉजिंगवर काही प्रमाणात गर्दी दिसत आहे. याबाबत लॉजिंग व हॉटेल व्यावसायिकांनी समाधान व्यक्त केले आहे.


**TENDER NOTICE**
**REDEVELOPMENT**

sealed tenders are invited from Reputed & capable Developers / Builders for Redevelopment of

**NAVANKUR CO-OP HOUSING SOCIETY LTD**
(Regn. No.KBA-HSG 339)
Plot No.50/11, Maharana Pratap Road, Panvel-410206, Dist-Raigad

**Area of Plot :- 627.5 M 2**
**No.of Members :- 9 Residentials**

The entire right to accept or reject offer will be with the "Navankur co. op Housing Society" Panvel & the decision taken by society is not question in any way

**Tender Documents are available at :**
**Project Management Consultant's (PMC) Office at :**
**RAHUL SASHTE & ASSOCIATES**
Shop No.16 & 18, Shree Ballaleshwar,
Near Sawarkar Chowk, Old Panvel-410206
Mob No. : 9320224225
Email : rahusashte4850@gmail.com

Cost of Tender Form : - 1000/- (Non Refundable)
by Cash / Pay order / D.D. only Payable at Panvel, in the Nl
**RAHUL SASHTE & ASSOCIATES**
**Date of issue of tender document : 22/2/2022**
**last Date of submission : 28/2/2022 up to 5.00 PM**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## घुसखोर बांगलादेशी नागरिकास अटक

बनावट आधार कार्ड, पॅनकार्ड, जन्मदाखला मिळून आलेले आहे. तो नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अनधिकृतरित्या राहत असुन त्याने वैध प्रवासी कागदपत्राशिवाय अवैध मार्गाने भारत – बांग्लादेश सीमेवरील मुलकी अधिका – याच्या परवानगीशिवाय भारतात घुसखोरी करून प्रवेश केला तसेच भारतीय नागरीकांना देण्यात येणाऱ्या व नमुद वर्णनाच्या बनावट कागदपत्राच्या आधार घेवून खरी असल्याचे भासवून शासनाची फसवणुक केल्याने त्याचेविरूध्द पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. अटक आरोपीस मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांनी ७ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुरी दिली आहे. पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, पोलीस सह आयुक्त जय जाधव, पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील, परिमंडळ २, पनवेल, भागवत सोनवणे, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र दौडकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरिक्षक संजय गळवे, पो.हवा. विकास साळवी, पो.हवा महेश धुमाळ, पोहवा सुनिल कुदळे, पोहवा अजित म्हात्रे, पोना पंकज चंदिले, पोना प्रकाश मेहेर, पोना जयदीप पवार, पोशि प्रविण पाटील, पोशि यादव गावीत या पथकाने केलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास पनवेल तालुका पोलीस ठाणेमार्फत चालु आहे.

## पनवेलमध्ये ॲडव्हान्स ट्रॉमा केअर सेंटर तसेच प्रसूती व बालसंगोपन केंद्र उभारावे

केअर सेंटर आणि महापालिका क्षेत्रात प्रसूती व बालसंगोपन केंद्र उभारण्यात यावे या मागण्यांचे निवेदन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री डॉ. मनसुख मांडविया यांना दिले. या दौर्यात केंद्रीय आर्थिक सल्लागार निलम्बुज शरण, राष्ट्रीय जन स्वास्थ्य प्रशिक्षण व अनुसंधान संस्थानचे संचालक डॉ. सुनील गीत्ते, सहसंचालक डॉ. सुधीर वांजे, सीएमओ (एसएजी), डॉ. सुपर्णा खेरा, संचालक प्राध्यापक डॉ. दीपक राऊत, सीनियर मेडिकल ऑफिसर डॉ. अमोल आडे आदी सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## आझाद मैदानातील आंदोलनात हजारोंच्या संख्येने सामील व्हा

मारुती महाराज पाटील, रायगड जिल्हा समन्वयक हरीश बेकावडे, मंगेश दळवी, अलिबाग तालुकाध्यक्ष नरेश सावंत, पेण शहर अध्यक्ष प्रवीण बैकर, अण्णा पार्टे, पी.टी.शिंदे, शंकर मानकवळे, के.जी.पाटील, मारुती भानुस्कर, नथुराम जागडे, काशिनाथ शिगवण, प्रकाश जाधव, ह.भ.प.पांडुरंग पाटील, मयूर सावळे, सागर पवार, श्रीकांत जाधव, सचिन पवार, संतोष जाधव, कमलाकर साळुंके, दिलीप शेडगे, सुनील सावळे यांच्या सह शेकडो मराठा समाज बांधव उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष विनोद साबळे म्हणाले कि, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी सरकार टाळाटाळ करत आहे. या आरक्षणासाठी छत्रपती संभाजी राजे यांना मुंबई येथे उपोषणाला बसावे लागते ही शोकांतिका आहे. सरकारला मराठा समाजाची ताकद दाखवून देण्यासाठी लाखो मराठे २६ फेब्रुवारीला मुंबईतील आझाद मैदानात धडकणार आहेत. रायगड जिल्ह्यातून हजारो मराठयांनी आपली उपस्थिती लावली पाहिजे. या साठी उपस्थित कार्यकर्त्यांनी खेडोपाडी जाऊन छत्रपती संभाजी राजे यांचे विचार पटवून द्यावे. समाजातील तरुण पिढीने या लढ्यात स्वतःला झोकून देण्याचे आवाहन विनोद साबळे यांनी यावेळी केले.

## वशेणी गावात घराला आग

शर्यतीचे प्रयत्न केले. तसेच सर्व प्रथम घरातील तिन सिलिंडर घराबाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. परंतु सदर आगीच्या भक्ष्यस्थानी गावंड कुटूंबियांच्या घरातील मौल्यवान वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, जीवनावश्यक वस्तू, कपडे जळून नष्ट झाले आहेत. या घटनेची माहिती पोलीस, महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. परंतु नेमकी आग कशा मुळे लागली याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी गावंड कुटूंबियांच्या संसाराची राखरांगोळी झाल्याचे भयानक चित्र समोर दिसत आहे. तरी शासनाने गावंड कुटूंबियांच्या संसाराला पुन्हा उभारी देण्यासाठी हातभार लावावा अशी मागणी वशेणी गावातील ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

### जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल मे.श्री राम समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे मालक श्री.प्रशांत काशिनाथ डोंगरे पत्ता : ऑफिस नं.एच–२१४, बेलापूर स्टेशन कॉम्प्लेक्स, २ रा मजला, सेक्टर–११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, यांनी मुळ मालक श्रीमती.मंगलुबाई काळ्या पाटील (लग्नाआधीचे नाव) सौ.मंजुळा रामभाऊ डाकी (लग्नानंतरचे नाव) राहणार : बोरखार, ता.उरण, जि.रायगड यांच्याकडून त्यांच्या मालकीच्या खालील वर्णनाची मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी मिळणारा क्षेत्र ४०० चौ.मी. चा भूखंड खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पागोटे, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नांव | युनिट केस/ मिळकत नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.गुंठे |
|---|---|---|---|---|
| पागोटे | ३९ | १७० | १२ | ०–२०–० |
| | | १७१ | ७ | ०–२५–४ |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/–**
**ॲड.रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए, प्रभात सेंटर,**
**सीबीडी बेलापूर, नवी मंबई–४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

### जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री.किरण विलास घरत यांनी सांगितल्याप्रमाणे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, मौजे : पुष्पक वडघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील प्रमाणे वर्णन केलेल्या जमीन मिळकती आहेत.

| नोड | भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| पुष्पक वडघर, ता.पनवेल, जि.रायगड | १२६ | १ | ९०.०० |

वर वर्णन केलेल्या मिळकती श्री.मनोज अंकुश म्हसकर यांना कायमस्वरुपी विक्री करण्यात येणार आहे. वरील वर्णन केलेल्या मिळकती अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, भाडेपट्टा, लिज, तबदील, ट्रस्ट, गहाण, कुळ वारस इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांच्याकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकती निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २१/०२/२०२२

**सही/–**
**ॲड.श्री.विनोद जी. ठाणगे**
**ऑफिस नं.१००, पहिला मजला,**
**म्युनिसिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स,**
**पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९३२४३४३५०६**

ॲड.वसंत गोविंद रवणे

### जाहीर नोटीस

कर्जत येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात

एम.ए. नं.३३/२२
ने.ता.७/३/२०२२

श्री.पांडु गोविंद उघडा
वय : ५० वर्षे, व्यवसाय : शेती
रा.वर्णे ठाकूरवाडी, पो.पळसदरी,
ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत पळसदरी
ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै.गोविंद उर्फ भाग्या आलू ठाकूर उर्फ उघडा यांचा मृत्यू दि.१०/०६/१९८२ रोजी झाला आहे. त्यांचे मृत्यूचा दाखला मिळणेकरिता सामनेवाला यांचेकडे अर्ज केलेला होता. परंतु सामनेवाला यांनी अर्जदार यांचे वडील कै.गोविंद उर्फ भाग्या आलू ठाकूर उर्फ उघडा यांचा मृत्यूची नोंद ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिस्टरला झालेली नसल्याचा दाखला देवून दिनांक १२/०१/२०२२ रोजी अर्जदार यांस कळविले. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांचे वडील कै.गोविंद उर्फ भाग्या आलू ठाकूर उर्फ उघडा यांचा मृत्यूची नोंद करण्याचा आदेश मिळणेकरिता सदरील अर्ज या मे.कोर्टात केलेला आहे.

तरी या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्यांचे वडील कै.गोविंद उर्फ भाग्या आलू ठाकूर उर्फ उघडा यांचा मृत्यूचा दाखला देणेस जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांचे वडील कै.गोविंद उर्फ भाग्या आलू ठाकूर उर्फ उघडा यांचा मृत्यूचा दाखला देण्याचा सामनेवाला यांस आदेश देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.०१/०२/२०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक दि.न्याया. कर्जत | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्याया. कर्जत |
|---|---|---|

ॲड.वसंत गोविंद रवणे

### जाहीर नोटीस

कर्जत येथील मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात

एम.ए. नं.२७/२२

श्री.पांडु आंबु उर्फ आंबो उघडा
वय : ६० वर्षे, व्यवसाय : शेती
रा.वर्णे ठाकूरवाडी, पो.पळसदरी,
ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत पळसदरी
ता.कर्जत, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची भावजय कै.हिरी महादू उघडा हिचा मृत्यू दि.१०/०७/१९९३ रोजी झाला आहे. तीच मृत्यूचा दाखला मिळणेकरिता सामनेवाला यांचेकडे अर्ज केलेला होता. परंतु सामनेवाला यांनी अर्जदार यांची भावजय कै.हिरी महादू उघडा हिचा मृत्यूची नोंद ग्रामपंचायतीचे जन्म मृत्यू रजिस्टरला झालेली नसल्याचा दाखला देवून दि.१२/०१/२०२२ रोजी अर्जदार यांस कळविले. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांची भावजय कै.हिरी महादू उघडा हिचा मृत्यूची नोंद करण्याचा आदेश मिळणेकरिता सदरील अर्ज या मे.कोर्टात केलेला आहे.

तरी या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार यांना त्यांची भावजय कै.हिरी महादू उघडा हिचा मृत्यूचा दाखला देणेस जर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी ती हरकत आमचेकडे लेखी पुराव्यासह ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत नोंदवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांची भावजय कै.हिरी महादू उघडा हिचा मृत्यूचा दाखला देण्याचा सामनेवाला यांस आदेश देईल. मागाहून कोणाचीही हरकत आल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

आज दि.०१/०२/२०२२ रोजी आमच्या सही शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक दि.न्याया. कर्जत | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्याया. कर्जत |
|---|---|---|

मा.पांडे साहेब कोर्ट

श्री.सचिन बा. कांबळे
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.२३७/२०२२
ने.ता.२३/०३/२०२२

श्री.रसई हुसेनमिया खमसे
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.घर नं.२२ बी, मु.ओवेगाव, पो.खारघर,
सेक्टर ३०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कु. सबा रईस खमसे हिचा जन्म दि.०९/११/२००६ रोजी रा.घर नं.२२ बी, मु.ओवेगाव, सेक्टर–३०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यावेळी राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव आई वडिलांकडून अनवधानाने कु.सबा रईस खमसे यांची जन्माची नोंद करायची राहून गेली आहे. परंतु काही कारणास्तव जन्माची नोंद करून घेणे व जन्माची नोंद कुठे करतात व कशासाठी करून घेतात याची आम्हा आई वडिलांना काही पूर्व कल्पना नव्हती.

तरी अर्जदार यांच्या जन्माची नोंद बद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या मागणीबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते सदरचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३/३ प्रमाणे जन्माची नोंदणी परवानगीचा अर्जदारांचा अर्जातील मागणी विनंती सिद्ध झाल्यास त्यांना हे जन्माची नोंद मंजूर करेल.

आज दि.२१/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल |
|---|---|---|

अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण साो.रायगड यांचे कोर्टात

मो.अप.क्लेम. नं.१०९/२०२०
नि.नं.१६/ड
ने.ता.२४/०२/२०२२

क्रिटोफर थॉमस गोम्स वगैरे १ — अर्जदार

विरुद्ध

गुरमित सिंग सहोटा
रिलायन्स जनरल इन्शुरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,

सामनेवाला नं. १) गुरमित सिंग सहोटा
प्लॉट नं.१० अे/१०३,
विशा आर्केड सेक्टर नं.०४,
खारअंबोली, ता.पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२१८

दिनांक १८/०७/२०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास मौजे : कलोते गावचे हद्दीत एन एच ४, मुंबई पुणे हायवेरोडवरील मुंबई लेनवर, भगवान धाब्याजवळ, खालापूर पोलीस ठाणे, ता.खालापूर, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ व नं.२ यांचे वडील मयत झाले आहेत. सदर अपघातामध्ये ट्रेलर क्र.एमएच–४६/एफ ५२६९ वरील चालक हा थॉमस एँथनी गोम्स याच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.३०,००,०००/– चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२४/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १६/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/– क.लिपीक जिल्हा न्या.रायगड–अलिबाग | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक जिल्हा न्या.रायगड–अलिबाग |
|---|---|---|

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## एक कोटी एक लाखांची फसवणूक, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शॉपचे रजिस्ट्रेशन करून न देता घेतलेले पैसे परत न केल्याप्रकरणी तिघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनुराधा दळवी, सुशांत दळवी, शंकर झा अशी तिघांची नावे आहेत.

सेक्टर–५, खारघर येथील रेणू नारायण दास यांना २०१४ मध्ये शंकर झा याने व्यवसायासाठी शॉप दाखवतो असे सांगितले. यावेळी सेक्टर ११ येथील चार शॉपचे एक कोटी वीस लाख रुपये सांगितले. त्यांच्यात ८० लाखात व्यवहार ठरला. आणि रजिस्ट्रेशन खर्च सहा लाख देण्याचे ठरले. रक्कम दिल्यानंतर शंकर झा याने शॉप नंबर तीन आणि चार चे रजिस्ट्रेशन करून दिले. त्यानंतर शॉप नंबर १ ते २ शॉपच्या रजीष्ट्रेशनबाबत विचारणा केली असता अनुराधा दळवी व शंकर झा यांनी एकाच वेळी ४ शॉपचे रजिस्ट्रेशन करता येत नसल्याचे सांगितले. व दहा दिवसांनी रजिस्ट्रेशन करू असे सांगण्यात आले. पुन्हा विचारणा केली असता थांबायला लागेल असे सांगण्यात आले. अनुराधा दळवी व शंकर झा यांच्याशी संपर्क करून पैसे परत मागितले. मात्र पैसे नसल्याचे अनुराधा दळवी यांनी सांगितले. त्यानंतर शंकर झा यांच्याकडे विचारणा केली असता तुम्हाला देशी कट्टाने कधी मारून टाकीन हे कळणार देखील नाही अशी धमकी दिली. त्यामुळे रेणूदास घाबरून गेल्या. अनुराधा दळवी, सुशांत दळवी व शंकर झा यांनी संगनमत करून रेणू दास यांची १ कोटी १ लाख रुपयांची फसवणूक केली.

## शिवजयंती निमित्त प्राचीन वस्तूंचे प्रदर्शन

**दै.रायगड नगरी । उरण**

शिवराज युवा प्रतिष्ठान तर्फे १८ फेब्रुवारी, १९ फेब्रुवारी २०२२ असे दोन दिवस शिवजयंती निमित्त विविध सामाजिक, धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दि.१८ रोजी द्रोणागिरी गडावरील हौदातील पाण्याने श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस अभिषेक घालण्यात आला. द्रोणागिरी किल्ल्यावर सापडलेली पुरातन शिवकालीन तोफेला सुद्धा अभिषेक घालण्यात आला. दि १९ रोजी डाऊरनगर येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात पाळणा गीत, प्रतिमा पूजन, प्राचीन वस्तू, नाण्यांचे पूजन करण्यात आले. द्रोणागिरी गडावरील शोध मोहिमेत सहकार्य करणाऱ्या सर्व मावळ्यांचा सत्कार करण्यात आला.

# पेण नगरपालिका निवडणुकीत दडपशाही चालू देणार नाही : शिशिर धारकर

**दै.रायगड नगरी । पेण**

मागच्या दहा वर्षेपासून पेण नगरपालिकेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांवर सत्ताधाऱ्यांनी दडपशाही सुरू केली आहे. ती दडपशाही यापुढे चालू देणार नाही, असे वक्तव्य शिशिर धारकर यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले.

यावेळी पुढे बोलताना शिशिर धारकर म्हणाले की, शहरातील अनेक विकास कामांबरोबर रिंगरोड आणि कसा । टाकलेले आरक्षण यामधून कोट्यावधी रूपये कमविले असून आपल्या स्वार्थासाठी रवि पाटील राजकारण करीत आहेत. त्यामुळे पेणच्या जनतेने यांच्यावर अधिक विश्वास न ठेवता वेळीच सावध होणे गरजेचे आहे. पेण अर्बन बँकेच्या बाबतीत मी स्वतः ठेवीदारांना पैसे मिळण्यासाठी प्रयत्न करीत असून सध्या न्यायालयीन लढा सुरु आहे. त्यामुळे त्यात अधिक बोलणे उचित ठरणार नाही, परंतु पेणकरांना या सर्व गोष्टींचा उलगडा व्हायला पाहिजे. खोपोली संघर्ष समितीच्या माध्यमातून ठेविदारांनी न लढता पेण अर्बन बँकेचे मुख्य ठिकाण पेण असल्याने पेणकरांनी एकत्र येऊन हा लढा दिला पाहिजे. संघर्ष समिती ठेविदारांच्या हिताचे



काम करीत नाही असेही धारकर यांनी सांगितले.

ज्या रवि पाटीलांचे तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील यांनी चार दिवस अगोदर सांगितले की अर्बन बँकेत माझे १० लाख रुपये अडकले आहेत ते शिशिर धारकर यांनी पहिले द्यावे आणि नंतरच बॅकेंबाबत बोलावे, मात्र हे धादांत खोटे असून २३ सप्टेंबर २०१० ला अर्बन बॅक बंद झाली. मात्र त्या अगोदरच १७ सप्टेंबरला १ लाख ४३ हजार, १९ सप्टेंबरला ५ हजार, २६ आणि २७ ला एक एक हजार काढले असून आता त्यांच्या खात्यात १ हजार ९६५ रुपये आहेत. त्यामुळे रवि पाटीलांच्या माणसांना याबाबतची अगोदरच कानकून लागली होती अस वाटतय. त्यामुळे यांचेच हात क्सबँक बुडविण्यात असू शकते, असाही आरोप शिशिर धारकर यांनी यावेळी केला.

बॅकेत माझ्या कुटुंबाचे ३ कोटी ५९ लाख रुपये अडकले मग मला जर माहिती असती तर ते आम्ही अगोदरच काढले असते. मात्र पेणकरांना मी कदापीही फसविणार नाही याउलट रवि पाटील जनतेची दिशाभूल करीत आहेत. नुकत्याच टाकलेल्या डांबर प्लान्टसाठी पैसे कमी पडत असल्याने त्यांनी पाटणेश्वर बॅकेच्या माध्यमातून १० जणांच्या नांवे १ कोटी पैसे काढले आहेत. याचा तपास सहकार खात्याने करावा असेही त्यांनी यावेळी सांगितले. तर सत्ताधाऱ्यांनी पेणला भकास केले असून आपण पेणचे पुणे करणार आहोत. शहरातील अंडरग्राऊंड गटारे, भुमिगत विद्युत लाईन, भाजी मार्केट यासह शहरात भरणारा बाजार या सर्व गोष्टींमध्ये हे सत्ताधारी पैसेच कमवित बसले आहेत. नगराध्यक्षांच्या स्वतःच्या बंगल्यात दिवसभर पाणी, मात्र पेणकरांना दिवसातून एक वेळच पनिंमिळतो, हा कुढला न्याय ? त्यामुळे पेणकरांच्या हितासाठी मी झटणार असून येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला बाजूला ठेवून सर्वांना बरोबर घेऊन निवडणुक लढवणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर रवि पाटील यांचा मुलगा यांनी सोशल नेटवर्कवर टाकले की बॅक बुडव्या शिशिर धारकरला भर नाक्यावर काळे फासणार. मात्र ज्याची बुध्दी तसा तो बोलणार पण अश्या दादागिरीला व दडपशाही आपण घाबणार नाही असेही त्यांनी यावेळी सांगितले. सदर पत्रकार परिषदेला ध्वजा गोरखा, भरत बडेला, संदिप मोने आदि उपस्थित होते.

# खारघर परिसरात सराईत मोबाईल चोरी करणारा गुन्हेगार गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरात सराईत मोबाईल चोरट्यास खारघर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्या अटकेमुळे मोबाईल चोरीसह चेन स्नॅचिंगचे गुन्हे उघडकीस आले आहेत.

खारघर येथे राहणारे विनोद शंकरराव चाटे , वय – ३८ वर्षे हे सकाळी ० ९ : १५ वा.चे सुमारास खारघर , सेक्टर २७ , रांजणपाडा ते गुरूद्वारा रोडवर पायी चालत असताना आरोपी काशिम मुक्तार दराणी उर्फ छोटा कासीम उर्फ तलब (२२ रा.आंबिवली) याने त्याच्याबरोबर असलेल्या इसमांशी संगनमत करुन काळया रंगाच्या पल्सर मोटार सायकलवरून पाठीमागुन येवुन फिर्यादीचे हातातील ६०,००० / – रु किंमतीचा मोबाईल जबरीने हिसकावून चोरून पळुन गेल्याचे तक्रारीवरुन खारघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद गुन्हयांचे अनुषंगाने अशा



प्रकारे मोबाईलची जबरी चोरी करणाऱ्या सराईत आरोपीचा शोध घेत असताना मिळालेल्या माहितीनुसार ठाणे कारागृहात अटकेत असलेला आरोपी नामे काशिम मुक्तार दराणी उर्फ छोटा कासीम उर्फ तलब वय २२ वर्षे रा. रूम नंबर ०४ पाटीलनगर, गणेश चाळ, अंबिवली ता.कल्याण याचा ताबा घेवुन कौशल्यपुर्वक तपास केला असता नमुद गुन्हयातील मोबाईल चोरी आरोपीने केल्याबाबत माहिती दिल्याने त्यास अटक करण्यात आली असुन त्यांचेकडुन फिर्यादीचा चोरी केलेला ६०,००० / – रू किंमतीचा मोबाईल जप्त करण्यात आला आहे. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ जय जाधव, शिवराज पाटील, परीमंडळ २, पनवेल, सहा.पोलीस आयुक्त, भागवत सोनावणे, पनवेल विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. संदीपान शिंदे, सपोनि मानसिंग पाटील, पोहवा बाबाजी थोरात, पोना प्रशांत जाधव, धनवटे, पोशि शिंगाडे, पोहवा वैद्य यांनी सदरची कामगीरी केली आहे.

# उरण मध्ये संघटनेचे १२ वे रायगड जिल्हा अधिवेशन

**दै.रायगड नगरी । उरण**

डेमॉक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया ( डी वाय एफ आय ) या युवक संघटनेचे १२ वे रायगड जिल्हा अधिवेशन उरण मधील कामगार भवन येथे काल संपन्न झाले. यावेळी युवकांना रोजगाराचा अधिकार व धर्मनिरपेक्ष समाजाच्या उभारणीसाठी संघर्ष करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या अधिवेशनाचे उदघाटन अलिबाग येथील जे एस एम महाविद्यालयाचे प्रा.प्रकाश दातार यांच्या हस्ते करण्यात आले.

उदघाटनाच्या वेळी दातार यांनी जगाच्या इतिहासात परिवर्तन करण्याची ताकत केवळ युवकांमध्ये असल्याने युवकांना संघटीत होण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच सध्याच्या सरकारच्या धोरणांच्या परिणामी देशात रोजगारात वाढ होण्या ऐवजी ३ कोटी कामगारांना आपला रोजगार गमवावा लागला असल्याचे सांगून शिक्षण ही केवळ श्रीमंतांची मक्तेदारी करण्याचा डाव सरकारने आखला असून त्या विरोधातही युवकांनी संघर्ष करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

सुरुवातीला संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष दिनेश म्हात्रे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर शहिदाना आदराजली वाहून अधिवेशनाची सुरुवात करण्यात आली. तर अधिवेशनात जिल्हा सचिव राकेश म्हात्रे यांनी मागील तीन वर्षांच्या कार्याचा अहवाल मांडला.त्याच्यावर चर्चा करण्यात आली. तसेच रोजगार हक्क, शिक्षण, प्रकल्पग्रस्त प्रश्न, पर्यावरण आदी विषयावर ठराव ही मांडण्यात आले.

तर जेएनपीटीचे कामगार नेते कॉम्रेड भूषण पाटील, डीवाय एफआय महाराष्ट्र राज्य महासचिव डॉ. प्रीती शेखर, सह सचिव महेंद्र उघडे, संतोष ठाकूर,जनवादी महिला संघटनेच्या नेत्या हेमलता पाटील, किसान सभेचे सचिव संजय ठाकूर व भीमराव शिकारे यांनी अधिवेशनाला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर पुढील तीन वर्षासाठी दिनेश म्हात्रे, अध्यक्ष, राकेश म्हात्रे, सचिव तर अमित पाटील यांची खजिनदार म्हणून व रोशन म्हात्रे, हिरामण पाटील, पराग ठाकूर, वैभव मो.पाटील, यंनिद्रा मोहिते, वैभव पाटील, ऋषिकेश पाटील व सुधीर पाटील यांची कमिटी निवडण्यात आली.




अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम. नं.११०/२०२०
नि.नं.१७/ड

क्रिटोफर थॉमस गोम्स वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
गुरमित सिंग सहोटा
रिलायन्स जनरल इन्शुरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं. १) गुरमित सिंग सहोटा
प्लॉट नं.१० अे/१०३,
विशा आर्केड सेक्टर नं.०४,
खारअंबोली, ता.पनवेल,
जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२१८

दिनांक १८/०७/२०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास मौजे : कलोते गावचे हद्दीत एन एच ४, मुंबई पुणे हायवेरोडवरील मुंबई लेनवर, भगवान धाब्याजवळ, खालापूर पोलीस ठाणे, ता.खालापूर, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ व नं.२ यांची आई मयत झाली आहेत. सदर अपघातामध्ये ट्रेलर क्र.एमएच–४६/एफ ५२६९ वरील चालक हा ग्लोरी थॉमस गोम्स याच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.३०,००,०००/– चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२४/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १६/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक जिल्हा न्या.रायगड–अलिबाग** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक जिल्हा न्या.रायगड–अलिबाग**

अॅड.निलांबरी तुकाराम कोकणे
८४३३९६३३३९

### जाहीर नोटीस

मे.ठाणे येथील दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८७२/२०२१
नि.नं.६

१) सौ.कमल आनंद ताटे
२) श्री.विजय आनंद ताटे
दोघे रा.जुनी बीबीडी चाळ, चाळ नं.८/ए, रुम नं.१८,
दहिवलकर बुवा मार्ग, पोलीस हुतात्मा मैदानाच्या मागे
नायगाव, दादर पूर्व, मुंबई, महाराष्ट्र ४०००१४
३) निलम अमोल पवार लग्नाआध्शीचे नाव निलम आनंद ताटे
रा. गाव–घोटील, पोस्ट : उमरकांचन, ज्योतीर्लिंग मंदिर मागे,
ढेबेवाडी, सातारा–महाराष्ट्र ४१५११२ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील कै. श्री.आनंद चिंतू ताटे यांचे निधन दि.२७/०७/२०२० रोजी मु.पो.तारुख, ता.कराड, जि.सातारा येथे निधन झाले आहे. कै.श्री.आनंद चिंतु ताटे यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मालमत्ता परिशिष्ट (अचल मालमत्ता)**
**घर नं.२२३६/०२४ (रुम नं.९),**
**शिदकृपा को.ऑ.हौ.सो.अर्जुनवाडी,**
**घणसोली, नवी मुंबई, ठाणे, क्षेत्रफळ : ३०० चौ.फूट**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत मे.न्यायालयात अर्ज केलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत योग्य कागदपत्रासहीत या न्यायालयात दाखल करावी. वील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.११/०२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, ठाणे** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, ठाणे**

अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

### जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम. नं.१८८/२०१८
नि.नं.१५/ड
ने.ता.११/०३/२०२२

भागूबाई संभाजी राऊत — अर्जदार
विरुद्ध
१) लतिफ गनी ॲण्ड सन्स
२) दि न्यू इंडिया इश्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं. १) लतिफ गनी ॲण्ड सन्स प्रा.लि.
रा.बीजेटीअे न्हावाशेवा, पनवेल
सिटी पनवेल, पनवेल, जि.रायगड
महाराष्ट्र ४१०२०६

दिनांक २९/०९/२०१८ रोजी दुपारी १२.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे : चौक गावचे हद्दीत, चौक मधला बस स्टॉप येथे साई हॉस्पिटल समोर, पुणे लेनवर, मुंबई पुणे हायवे रोड क्र.४, खालापूर पोलीस स्टेशन, ता.खालापूर, जि.रायगड यांचे हद्दीत सदरचा अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील संभाजी विठ्ठल राऊत हे मयत झालेले आहेत. सदर अपघातामध्ये सदर अपघातामध्ये टँकर क्र.एमएच ०६/ अेसी ८८१८ वरील चालक हा मयत संभाजी विठ्ठल राऊत यांच्या मरणास कारणीभूत ठरला आहे.

म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.४,००,०००/– चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.११/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख १७/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक जिल्हा न्या.रायगड–अलिबाग** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक जिल्हा न्या.रायगड–अलिबाग**

मा.गोडसे सो

अर्जदारातर्फे वकील
ॲड.विनय बी शुक्ला
ॲड.नागेश अ. हिरवे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व) स्तर पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.४८५/२०१९
नि.नं.७/ड
ने.ता.२५/०३/२०२२

कै.मोतीलाल ताराचंद शालिया (मयत) तर्फे वारस
श्री.संजीव मोतीलाल शालिया
रा.ए–२०१, पुष्प विहार, शास्त्री नगर,
वसई (पश्चिम), जिल्हा : पालघर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.मोतीलाल ताराचंद शालिया (मयत) यांचे निधन दि.२१/०३/२०१८ रोजी ए–२०१, पुष्प विहार, शास्त्री नगर, वसई (पश्चिम), जिल्हा : पालघर येथील त्यांचे राहते घरी झाले आहे. कै.मोतीलाल ताराचंद शालिया यांचा ५०% हिस्सा असलेली ताबे कब्जा व वहिवाटीतील निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन**
**ए/१४०४, १४ वा मजला,**
**साई साक्षात, प्लॉट नं.९,**
**सेक्टर–६, खारघर,**
**तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**(क्षेत्र ९१९.५० स्क्वे.फुट कार्पेट, ८५.४२ स्क्वे.फुट स्टील्ट पार्कींग)**

कै.मोतीलाल ताराचंद शालिया यांचे मृत्यू पश्चात त्यांस अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. सबब सदरचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदारांनी सदर अर्ज या मे.न्यायालयात दाखल केला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत आपल्या हरकती या मे.न्यायालयात सादर कराव्यात.

जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू न्यायालय अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू मयत कै.मोतीलाल ताराचंद शालिया यांचे वारस घोषित करून अर्जदारांना वारस दाखला देण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

सदर नोटीस आज दि.२१/०२/२०२१ रोजी न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

Hon'ble Godase Madam

ADV. B.U.TAYADE

### PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON.CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL-AT PANVEL
CM.A. N0. 1790/2021
Exh No. 7/D
N.D. 23/03/2022

1) Mrs. Kamala Vishnu Patil, Widow
(Wife of Deceased Vishnu Patil)
Age- 58, Occupation-Housewife,
R/o. Shantaram House, Near Patil Cable,
Trombay Koliwada VTC: Mumbai,
Po. Donar, Sub District : Kurla,
District: Mumbai Sub urban,
State- Maharashtra ,400088.
2) Mr. Vilas Vishnu Patil
(Son of Deceased Vishnu Patil)
Age-48, Occupation-Service,
R/o. Near Patil Cable, Patil Ali,
Room No. 2, Shantaram Patil House,
Trombay Koliwada, T F Donar- Mumbai
Maharashtra-400088
3) Mrs. Prabhavati Harshad Patil
(Name after Marriage)
(Ms. Prabhavati Vishnu Patil)
(Daughter of Vishnu Patil)
Age- 45, Occupation- Housewife
(Daughter of Deceased Vishnu Patil
R/o. In Front of Ram Bharose Hotel.
Shravanibai Vaman Koli House.
Mahul Gaon, Chembur-Mumbai-(Sub-urban),
Maharashtra, 400074.
4) Mrs. Shubhangi Krishana Vaity
(Name after Marriage)
(Ms. Shubhangi Vishnu Patil)
Age-44 Yrs, Occupation- Housewife
Near Patil Cable Kamalabai Niwas
Dr. Vasant Shetty, Trombay koliwada,
TF Donar S O, T F Donar-Mumbai,
Maharashtra, 400088. R... Applicants
V/S.
Nil ... Non Applicant

The application for Heirship Certificate of deceased "Vishnu Shantaram Patil under Chapter VIII OF Bombay Regulation 1887.

That, the deceased Vishnu Shantaram Patil died on 09/06/2020 at Trombay Koliwada, Shantaram Patil House, TT.F. Donar, S O. Greater Mumbai, Mumbai Sub-urban, Maharashtra, 400088 and he purchased the property, at Khanda Colony, New Panvel, (West), Navi Mumbai, in Panchayal Samiti, Panvel, Dist. Raigad. I/We, Mrs. Kamala Vishnu Patil, Mr. Vilas Vishnu Patil, Mrs. Prabhavati Harahad Patil, & Mrs. Shubhangi Krishna Vaity have applied before this Hon'ble Court for Heirship Certificate in favour of them and Mrs. Prabhavati Harahad Patil and Mrs. Shubnangi Krishna Vaity Relinquished their rights and prayed that the Heirship Certificate may be granted in favour of Mrs. Kamala Vishnu Patil and Mr.Vilas Vishnu Patil. The description of the Property is as follows.

**Second Schedule of the properties :-**

a) All that peace and parcel of land bearing Flat No. 102, First Floor, in "B" Wing, admeasuring about 542 sq. ft. Built Up or about 50.36 Sq. mtrs., in the building known as "Nilkanth Darshan* constructed on Plot No. 11 & 12, Sector-07, situated at Khanda Colony, New Panvel (West), Navi Mumbai-, Raigad, Maharashtra, 410206, registered in The Office of Joint Sub-Registrar, Uran, vide Entry at Serial No. 1859/2002 on 22/03/2002.

b) **The First Schedule of Property**

All the piece or parcel of land bearing Plot No. 11 & 12, situated at Sector-7, Khanda Colony, New Panvel (West), Dist.-Raigad, Navi Mumbai, admeasuring about 500 sq. mtrs. Situated at Village-Khanda Colony, Ta. Panvel, within the limits of Zillaha Parishad Raigad, Panchyat Samiti Panvel, within Panvel Municipal Corporation Maharashtra and bounded as under that is to say :

On or Towards East -
On or Towards West -
On or Towards South -
On or Towards North -

Situated at Village-New Panvel (West), Tal-Panvel, within the limits of Zillaha Parishad Raigad, Panchayat Samiti Panvel, and within Municipal Corporation Panvel.

After the death of deceased if there is any encumbrance or interest by way of any persons regarding the above said property should submit their claim before this H'ble Court within 30 days of this notice. If there is no objection raised by any person before this H'ble Court within stipulated period the Heirship Certificate will be declared in favour of the Applicant Nos. 1, 2 & 3

Today it is signed and seal by me on dated 21/02/2022

Sd/- Jr.Clerk CJSD, Panvel | Court Seal | Sd/- Asstt. Superintendent CJSD, Panvel

# संक्षिप्त...

## बुक केलेला फ्लॅट व गुंतवलेले पैसे परत न देता केली ८२ लाख ८० हजारांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बुक केलेला फ्लॅट व गुंतवलेले पैसे परत न देता ८२ लाख ८० हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी चौघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन कृष्णा भोसले (वय ४६), भाग्यश्री सचिन भोसले, प्रवीण कृष्णा भोसले, अमोल हनुमंत भोसले अशी चौघांची नावे आहेत.

सेक्टर १५, सानपाडा येथील सोमनाथ श्रीपतराव धुमाळ हे मे. वन अर्थ इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड यांच्या कामोठे येथील कार्यालयामध्ये सचिन भोसले व भाग्यश्री भोसले यांना भेटले. त्यांनी सेक्टर ४७, जुई या ठिकाणी फ्लॅट बुक केला. त्यानंतर धुमाळ यांनी ५ लाख २५ हजार रुपये भरले. २०१३ मध्ये सदनिका धुमाळ यांनी त्यांच्या नावावर करून घेतली. नोंदणीनंतर आयडीबीआय बँकेतून १४ लाख रुपयांचे घेतलेलले कर्ज हे सचिन भोसले यांच्या खात्यात जमा झाले. या कर्जाच्या हप्त्यापोटी एक लाख १३ हजार ५७६ रुपये धुमाळ यांनी भरलेले आहेत. २०१५ मध्ये सिडकोने इमारत बेकायदेशीर आहे व सिडकोचे बांधकाम परवाना नसताना बांधण्याच्या कारणात्सव इमारत पाडून टाकली. त्यानंतर भोसले यांच्याकडे पैशांची विचारणा केली असता त्यांनी दुसऱ्या प्रोजेक्टमध्ये फ्लॅट देतो असे सांगितले. मात्र भोसले यांच्याकडून पैसे परत देण्यात आले नाही. भोसले यांनी पैसे परत न करता धुमाळ यांची २३ लाख ७६ हजार रुपयांची फसवणूक केली. तर इतर सात जणांची एकूण ८२ लाख ८० हजारांची फसवणूक केली.

## ना.उदय सामंत यांचे हस्ते नगरसेवकांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

नुकत्याच पार पडलेल्या म्हसळा नगर पंचायत निवडणुकीत शिवसेनेचे नवनिर्वाचित नगर सेवक तथा शिवसेनेचे गटनेते अनिकेत पानसरे आणि नगरसेविका राखी अजय करंबे यांचा शाल, श्रीफळ आणि पुष्प गुच्छ देऊन राज्याचे उच्च शिक्षण आणि तंत्र शिक्षण मंत्री नाम. उदय सामंत यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी आम. भरतशेठ गोगावले, प्रमोद घोसाळकर, राजीव साबळे, जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, माणगाव नगर पंचायत नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, म्हसळा तालुका शिवसेना प्रमुख सुरेश कुडेकर, अजय करंबे आदि मान्यवर उपस्थित होते. या वेळी नाम. उदय सामंत यांनी नवनिर्वाचित नगर सेवक अनिकेत (मुन्ना ) पानसरे आणि नगरसेविका राखी करंबे यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. म्हसळा नगर पंचायतीत विकास कामे सुचवा ती मंजूर करण्याची सर्वस्वी जबाबदारी माझी असून विकास कामांसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही असे आश्वासन नाम. उदय सामंत यांनी दिले.

# कर्जतमध्ये आरोग्यविषयक समस्या सोडवण्यासाठी काम करणार : प्रिया दत्त

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यात आरोग्य विषयक काम करण्यासाठी बरेच काम आहे त्यासाठी इनर-व्हील क्लब ऑफ कर्जत बरोबर मैत्री केली असून यापुढे नर्गिस दत्त फाउंडेशन मिळून काम करु असे प्रतिपादन माजी खासदार प्रिया दत्त यांनी कर्जत येथे केले.




इनरव्हील क्लब ऑफ कर्जत आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या विद्यमाने नर्गिस दत्त फाउंडेशन आणि अपोलो कॅन्सर सेंटर यांच्या सहकार्याने कर्जत मध्ये मोफत मेघा कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन किरवली येथील शेळके मंगल कार्यालयात करण्यात आले होते, शिबिराचे उदघाटन नर्गिस दत्त फाऊंडेशच्या प्रिया दत्त यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी आमदार सुरेश लाड, प्रांत अधिकारी अजित नैराळे, तहसीलदार विक्रम देशमुख, प्रतिक्षा लाड, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा करुणा पराडकर, उपाध्यक्ष उत्तरा वैद्य, सचिव मोनिका बडेकर, खजिनदार पल्लवी सावंत, आय एस ओ शिल्पा दगडे,ज्योत्स्ना शिंदे,किरवली ग्रामपंचायत सरपंच संतोष कांबरी आदी उपस्थित होते.

सचिव मोनिका बडेकर यांनी प्रिया दत्त यांची ओळख करून दिली व त्यांच्या कार्याची माहिती माहिती सांगितली.नर्गिस दत्त फाऊंडेशच्या प्रिया दत्त यांनी ग्रामीण भागात इनरव्हील क्लब ने विशेष म्हणजे मोनिका बडेकर यांनी पुढाकार घेवून हे शिबीर आयोजित केले, त्यामुळे आता त्यांची आणि आमची मैत्री झाली आहे मला कधीही आवाज द्या नर्गिस फाऊंडेशन तुम्हाला साथ देईल असे सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अवंतिका गायकर यांनी केले तर उत्तरा वैद्य यांनी आभार मानले.

या शिबिरात कॅन्सर स्क्रीनिंग प्रोस्टेट स्पेसिफिक ऑटीजन टेस्ट सर्व्हिकल पॅप टेस्ट, डोके आणि मान स्क्रीनिंग,सीबीसी रक्त तपासणी, सर्वसाधारण तपासणी, तसेच दमा आणि सीओपीडी साठी चाचणी करण्यात आल्या. अपोलो हॉस्पिटल हे डॉक्टर जितेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली लुपिन चे अल्थमान शेख, नर्गिस दत्त फाऊंडेशनचे समिर कुरेशी, पथॉलॉजी चे मोहिब शेख यांनी तपासणी करून मोफत औषधे दिली दिली, यावेळी १६७ जणांनी तपासणी करून घेतली. याप्रसंगी तन्वी जोशी, साक्षी अडसुळे, सरस्वती चौधरी, मिना प्रभावळकर, शीला गुप्ता, वैशाली दांडेकर, भाग्यश्री शेळके, सुरेखा मराडे, दीपा देशमुख, सुलोचना गायकवाड, सुप्रिया गिरी आदी सह ग्रामस्थ उपस्थित होते.

## जि प सदस्य विलास फडके यांच्या पुढाकाराने आरोग्य शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्रामपंचायत चिपळे, होरीझन डायग्नोस्टिक व गुड हेल्थ क्लिनिक यांच्या माध्यमातून आरोग्य शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळेस आपली प्रस्तावना करताना डॉक्टर गिरीश इंगळे यांनी आमदार बाळाराम पाटील यांचे कौतुक केलं ते स्वतः यापूर्वी जे जे हॉस्पिटल ब्रीच कँडी हॉस्पिटल आदी ठिकाणी कार्यरत असल्याचे देखील त्यांनी सांगितलं. या शिबिराची सुरुवात होण्यापूर्वीच ३०० पेक्षा जास्त लोकांनी रजिस्ट्रेशन केलं होतं. त्या नंतर प्रत्यक्ष येणाऱ्यांची गणती वेगळी होती म्हणजेच नागरिकांचा अतिशय मोठ्या प्रमाणात प्रतिसाद या शिबिराला लाभला.

या कार्यक्रमाला आमदार बाळाराम पाटील, काशिनाथ पाटील, तालुका चिटणीस राजेश केणी, महापालिका जिल्हा चिटणीस गणेश कडू जिल्हापरिषद सदस्य विलास फडके, क्रांतिकारी सेवा संघाचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष नामदेव शेठ फडके, रिटघर गावचे माजी सरपंच सुभाषशेठ भोपी, चिपळे ग्रामपंचायतीचे सदस्य चिपळे विहिघर, बोंनशेत येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संदीप परब यांच्या श्री बल्लाळेश्वर देवालय पुस्तकाचे प्रकाशन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

प्रसिद्ध इतिहास संशोधक संदीप मुकुंद परब यांनी लिहलेल्या श्री बल्लाळेश्वर देवालय या पुस्तकाचे रविवारी (ता.२०) श्री बल्लाळेश्वर मंदिरात देवस्थान अध्यक्ष अॅड.धनंजय धारप यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. या पुस्तकात मंदिराचा इतिहास माहिती ,पुरावे व दाखल्यांच्या आधारे दिली आहे.

हे देवालय आणि तत्कालीन इतिहास हाच मुळात संशोधनाचा विषय असल्याचे जाणून लेखक संदीप मुकुंद परब यांनी या पुस्तकाचे लेखन केले. चित्रांगद पब्लिकेशन मुंबई यांनी सदर पुस्तक प्रकाशित केले आहे. हे पुस्तक परिपूर्ण करण्याकरिता लेखकाने घेतलेले परिश्रम पुस्तकात प्रकर्षाने दिसून येतात. अत्यंत सोप्या भाषेत ऐतिहासिक, पौराणिक आणि स्थापत्य शास्त्राचे संदर्भासहित दिलेले दाखले व पुरावे या पुस्तकाची विश्वासार्हता पटवून देतात. तसेच कॅमेऱ्याने टिपलेले बारकावे आणि विषयानुसार सचित्र विश्लेषण हे पुस्तक आकर्षक बनविण्यास सहाय्यभूत ठरते. इतिहासा बरोबर चालत आलेले श्रीमंत मोरोबा फडणीस यांची पेशवाईतील कारकिर्द आणि पोर्तुगीज घंटेचा श्री बल्लाळेश्वर देवालया पर्यंतचा प्रवास या पुस्तकास अभ्यासा बरोबर रंजकतेची जोड देते. हे पुस्तक सर्वसामान्यांपासून ते अगदी पुरातत्व अभ्यासक, इतिहास संशोधक, इतिहास अभ्यासक आणि स्थापत्य कला अभ्यासकांपर्यंत सर्वांना उपयुक्त ठरेल असा विश्वास परब यांनी व्यक्त केला आहे. या प्रकाशन सोहळ्यास लेखक संदीप परब, श्री बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ड. धनंजय धारप, विश्वस्त सचिन साठे, उपेंद्र कानडे, राहुल मराठे यांच्यासह ड. नितीन शेवाळे, कोकण इतिहास परिषदेचे कार्यकारणी सदस्य प्रवीण कदम, संदीप वैशंपायन, तहसीलदार दिलीप रायन्नवार,गणेश रघुवीर, योगेश मोरे, चंद्रशेखर सोमण सुभाष मानकर, रविंद्र वानखेडे,केतन देसाई आदी मान्यवर उपस्थित होते.



# सायन पनवेल महामार्गावर जबरी चोरी करणाऱ्या गुन्हेगारास खारघर पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहत परिसरात असलेल्या सायन-पनवेल महामार्गावर जबरी चोरी करणाऱ्या गुन्हेगारास खारघर पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्याकडून गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत केला आहे.

अनिलकुमार श्रीरामफल , वय ३० वर्षे यांचे ताब्यातील टेम्पो क्र डीपी ०१ अ ९०४२ घेवून जात असतांना त्यांनी खारघर टोलनाक्या जवळ रस्त्याचे बाजुला टेम्पो उभा करून टायर चेक करत असताना अनोळखी आरोपीत यांनी रिक्षातुन येवुन फिर्यादीचे टेम्पो समोर थांबुन टेम्पो चालकास शिवीगाळ व दमदाटी करून त्याचे हातातील एमआय रेडमी अॅन्ड्रॉईड कंपनीचा मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीने एका आरोपितास पकडले त्यावेळी फिर्यादी हे मोबाईल सोडत नाही हे पाहून फिर्यादीचे हातावर चाकुने सपासप वार करून मोबाईल जबरीने चोरून नेल्याने दिलेल्या तक्रारीवरून खारघर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

वर नमुद गुन्हयातील आरोपीताबाबत कोणताही ठोस पुरावा नसताना कौशल्यपुर्वक तांत्रिक तपास करुन यातील आरोपी अब्दुलहक सब्रुद्दीन खान वय २४ वर्षे यास गोवंडी कमलानगर, मुंबई येथुन अटक करण्यात आली. सदर गुन्हयाचे तपासात आरोपीकडुन फिर्यादीचा चोरी केलेला १०,००० / - रू किंमतीचा मोबाईल व गुन्हा करण्यासाठी वापर केलेली रिक्षा असा एकुण १,६०,००० / - रू किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आले आहेत.

सदरची कामगीरी पोलीस आयुक्त बिपिन कुमार सिंह, पोलीस सह. आयुक्त जय जाधव, पोलीस उप आयुक्त शिवराज पाटील,



परिमंडळ २, पनवेल, भागवत सोनवणे, सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभाग , नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि संदिपान शिंदे, सपोनि मानसिंग पाटील, पोउपनिरी शिरीष यादव, पोहवा बाबाजी थोरात, पोना प्रशांत जाधव, पोना धनवटे, पोशि शिंगाडे, पोहवा वैद्य यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास खारघर पोलीस ठाणेमार्फत चालु आहे.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा/ वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा/भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार करारनामा/ वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **नोड - करंजाडे** | | | | | | | | |
| १ | ११६ | करंजाडे ७० | ८८/१ई | ०-४३-५ | ४६०० चौ.मी. पैकी ३८५० चौ.मी. | मौजे करंजाडे, भूखंड क्र. ०१, सेक्टर-२A, क्षेत्र-३८४९.६८ चौ.मी. | मा. न्यायालयिन वारसदाखला क्र. १९३/१९९५ व ४९/१९९७ नुसार - कै. तुकाराम जोमा म्हात्रे व कै. भागीरथी तुकाराम म्हात्रे यांचे वारस - श्रीमती हिराबाई नारायण म्हात्रे | मा. दिवाणी न्यायालय वाशी आ. सी. क्र. ८०९/२०१४ व गु. रं. नं. ८३/२०१३ या दाव्यामध्ये दिलेल्या निकालानुसार |
| | | करंजाडे III/ KRJD/SR-१२/३ | १००/१ | ०-२२-५ | | | | |
| | | करंजाडे १८ नविन | १०४A/१ | ०-०२-८ | | | | |
| | | करंजाडे ८१ (न्यु) | १०१/ ३+५A | १-२०-४ | | | | |
| | | करंजाडे ५२ (न्यु) | १०१/२ | १-२४-४ | | | | |
| | | करंजाडे ११४ (न्यु) | ११९/१ १०४A/३ ११८/१ | ०-१९-१ ०-२५-० ०-८२-२ | | | | |
| | | करंजाडे ११२/११४ | ११७/० | ०-५७-० | | | | |
| | | करंजाडे ७३/४२ | ४/३ | ०-३०-१ | | | | |
| | | | **एकुण संपादित क्षेत्र** | **५-२७-०** | | | | |
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| २ | तळोजा १०८२ | पेंधर १/२००८ | २५०/२ २६४/७ | ०-२२-० ०-२९-० | ४५० चौ.मी. | भूखंड क्र. १२H, सेक्टर-२४, क्षेत्र-४४९.६२ चौ.मी. | **कै. सावित्रीबाई आत्माराम कदम (मयत) यांचे वारस** श्रीमती जयश्री दगडु दळवी | निरंक |
| ३ | तळोजा १००० | पडघे १७B | १६/२ | ०-१८-० | १५० चौ.मी. | भूखंड क्र. १४४, सेक्टर-२, क्षेत्र-१४९.८७ चौ.मी. | **कै. शांताराम आंबो भोईर (मयत) व कै. देवकीबाई शांताराम भोईर (मयत) यांचे वारस** १) श्री. त्रिबंक शांताराम भोईर २) श्रीमती गोदाबाई माया जोशी ३) श्रीमती मुक्ताबाई हिरामण उर्फ घंटुराम पाटील | निरंक |
| ४ | उलवे १७५ | गव्हाण ७६४ | २१५/१२ २१५/७ २१५/११ | ०-०९-१ ०-४८-४ ०-११-६ | एकूण मंजूर पात्रता ६०० चौ.मी. पैकी ३०० चौ.मी. प्रस्तावित | भूखंड क्र. बी-५३, सेक्टर-०८, क्षेत्र-३०० चौ.मी. | **श्री. वसंत हरी पाटील** | रे.मु.क्र. १४३/२००५ हा दावा प्रस्तावित मिळकतीचे अनुषंगाने ठरावा करता व सरस निरस वाटपकरीता दाखल केला होता. सदर दावा दि. २६.०१.२००६ रोजी निकाली झाल्याचे दिसून येते. सदर दावा मिळकतीचे मोबदल्यात १२.५ टक्के योजनेतील भूखंड व वाढीव नुकसान भरपाईचे रकमेत वादीस अर्धा हिस्सा देण्यास प्रतिवादी तयार आहेत असे नमूद केले आहे. |
| | | | **एकुण** | **०-६९-१** | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**
सिडको/जनसंपर्क/४३४/२०२१-२२



मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
अॅड.गुरुनाथ दत्ता भगत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो. वर्ग १ यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.६२८/२०१९
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०३/२०२२

श्री.विश्वनाथ हरिश्चंद्र म्हात्रे
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
रा.बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
निबंधक ग्रामपंचायत गव्हाण
जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी
कार्यालय : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१८ — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी त्यांच्या आजीचा मयत शिमगूबाई हिरा म्हात्रे यांचा मृत्यू दि.३०/०५/१९९७ रोजी बेलपाडा, पो.जासई, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. तशी मृत्यूची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.६२८/२०१९ दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदाराचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : /०२/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालील प्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही जमीन मालक / भोगवटादार श्री.अशोक कुमार पंढरीनाथ प्रधान, श्री.चंद्रकांत पंढरीनाथ प्रधान यांचे सामाईक नावे दाखल आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल हे त्यांचेकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदरहू जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : घोट, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ६५ | ११ | ००-०६-०० पो.ख.००-०१-०० | ०.१६ |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दिवाणी दावा, महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल नमूद केलेले मालक / भोगवटादारा बरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०२/२०२२

**सही/-**
**अॅड.अमित बाळाराम पाटील**
**यशोकिरण सोसायटी, ऑफिस नं.०५,**
**तळमजला, सावरकर चौक, लोखंडीपाडा,**
**पनवेल, ता.पनवेल-४१०२०६**